॥ या विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४—२५/२८६ दिनांक २७/११/२०२४

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: जिल्हा, विभाग व राज्य युवा महोत्सव २०२४—२५ मध्ये सहभागी होणे बाबत.
संदर्भ: मा. सुरज पांढरे, आयुक्त, क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. क्रियुसे/युवा महोत्सव/२०२४/का १०/३०७५ दिनांक २५ नोव्हेंबर २०२४

महोदय,

उपरोक्त विषयी : मा. सुरज पांढरे, आयुक्त, क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भिय पत्रान्वये युवकांचा सर्वांगिण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढिस लागणे यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार द्वारे आयोजन करण्यात येते. राज्यात सन २०२४—२५ या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत दिल्ली येथे करण्यात येणार आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सोबतच्या पत्रात निर्देशित केलेल्या सुचनांप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर आयोजित युवा महोत्सव २०२४—२५ मध्ये उत्सफुर्तपणे सहभागी होण्यासाठी कळविण्यात यावे, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

महाराष्ट्र शासन

# क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

**शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळूंगे-बालेवाडी, पुणे-४११०४५.**

**संकेतस्थळ :** https://sports.maharashtra.gov.in **ई-मेल:** desk10.dsys-mh@gov.in

क्र.क्रीयुसे/युवा महोत्सव/२०२४/का१०/ ३०५५ दि. 25 NOV 2024

प्रति,
विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा ( सर्व )
जिल्हा क्रीडा अधिकारी , ( सर्व )

**विषय - जिल्हा, विभाग व राज्य युवा महोत्सव २०२४-२५ आयोजन बाबत**

संदर्भ - १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शानिक्र.युकयो-२०१२/प्रक्र.६७/क्रीयुसे-३ दि.६.१.२०१४
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शानिक्र.युकयो-२४२३/प्रक्र.४८/क्रीयुसे-३ दि.२६.१२.२०२३
३. युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार यांचे दि.२६.७.२०२४ चे पत्र
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे क्र.युवको-२०२४/पक्र.१००/क्रीयसे-३ दि.१४.८.२०२४ चे पत्र
५. क्रीडा व युवक सेवा संचालनसलयाचे समक्रमांक दि. २६.८.२०२४, दि.८.१०.२०२४ , ५.११.२०२४ रोजीचे पत्र
६. युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार यांचे दि.२०.११.२०२४ चे पत्र तसेच शालेय शिक्षण व साक्षरात विभाग, भारत सरकार यांचे दि.२२.११.२०२४चे पत्र

युवकांचा सर्वागिण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढिस लागणे यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार आयोजन करण्यात येते.राज्यात सन २०२४-२५ या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन दि.१२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधित दिल्ली येथे करण्यात येणार आहे. मा.सचिव, युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय , भारत सरकार यांनी दि.२२.११.२०२४ रोजी बैठक घेतली असून राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ बाबत बाबी व सहभाग संख्या याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

१. राष्ट्रीय युवा महोत्सव दिल्ली येथे दि.११ ते १२ जानेवारी २०२५ या कालावधित होणार आहे.

२. युवा महोत्सवासाठी प्रत्येक राज्याचे १०० युवांचे पथक यापूर्वी पाठविण्यात येत होते ही संख्या प्रत्येक राज्यासाठी ४० निर्धारीत करण्यात आलेली आहे. यामध्ये युवा महोत्सव बाबीमधिल सहभाग ३० व युवा आयकॉन सहभाग १० असे ४० जणांचे पथक पाठवण्यात यावे. यामध्ये वाद्यवृंद हे सहभागी असणार आहेत.

राज्यस्तरावरुन राष्ट्रीय स्तरावर खालील प्रमाणे महाराष्ट्र राज्याचा संघाची संख्या राहणार आहेत.

| अक्र | बाब | | सहभाग संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | **स्पर्धात्मक** | | |
| १ | संकल्पना आधरीत स्पर्धा | **" विज्ञान व तंत्रज्ञान यामधिल नवसंकल्पना "** "Innovation in Science and Technology" | ५ | केद्र शासन निश्चित करणे त्यानुसार अटी,नियम, वेळ, सहभाग संख्या इ. राहणार आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भत राहील. |
| २ | सांस्कृतिक | समूह लोकनृत्य | १० | |
| | | लोकगीत | १० | |
| ३ | कौशल्य विकास | कथा लेखन | १ | |
| | | चित्रकला | १ | |
| | | वक्तृत्व | १ | |
| | | कविता | १ | |
| ४ | युथ आयकॉन | युथ आयकॉन | १० | महाराष्ट्र राज्याचे १० युवा आयकॉन राष्ट्रीय युवा महोत्सवसाठी पाठविण्यात येतील. |
| ५ | | संघ व्यवस्थापक | १ | |
| | | एकूण | ४० | |

वरील बाबीचे स्पर्धा विचारात घेवून यापूर्वी दिलेले नियम यानुसार संघ/वैयक्तिक बाबीमध्ये जिल्ह्या/विभाग संघ पुढील स्तरावर पाठविण्यात यावा.

लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भत राहील . राज्याचा संघ पाठविण्याची संख्या ४० राहील. त्यानुसार जिल्हा,विभाग व राज्य युवा महोत्सव संपन्न करावेत. ज्या जिल्हयांचे जिल्हास्तरावरील युवा महोत्सव संपन्न झालेले आहेत त्यांना वरील नुसार आपला विभाग स्तरावर संघ पाठवावा.

३. राष्ट्रीय युवा महोत्सव राज्याचा संघ पाठविताना १० युवा आयकॉन हे १५ ते २९ या वयोगटातील निवडण्यात येणार आहेत. यासाठी प्रत्येक जिल्हयाने युवक कल्याण क्षेत्रात तसेच युवांना प्रभावित करणारे कार्य केलेले १५ ते २९ वयोगटात युवा यांची ५ नावे विभाग स्तरावर पाठवावीत यामधून प्रत्येक विभागाने ५ नावे राज्य स्तरावर शिफारस करावीत यामधून १० जणांची निवड राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी करण्यात येईल. शिफारस करणा-या युवांची माहिती खालील नमुन्यात पाठविण्यात यावी.

| अक्र | नाव व पत्ता | ईमेल आयडी व संपर्क क्रमांक | युवांनी केलेल्या कार्याची संक्षिप्त माहिती , अदाजित २००० शब्दात |
|---|---|---|---|
| | | | |

**४. राष्ट्रीय युवा महोत्सव - विकसित भारत यंग लिडरर्स डायलॉग ( Viksit Bharat Young Leaders Dilogue ) -**

युवांच्या भारत निर्माणासाठी नवीन संकल्पना विचारात घेवून युवांना राष्ट्र निर्माणमध्ये सहभागी करुन त्यांची दूरदृष्टीता विचारात घेणे आवश्यक आहे या अनुषंगाने राष्ट्रीय युवा महोत्सव अंतर्गत विकसित भारत यंग लिडरर्स डायलॉग अंतर्गत खालील प्रमाणे संकल्पना संदर्भांकित पत्राव्दारे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

१. Tech for Viksit Bharat

२. Vikas Bhi Virasat Bhi

३. Empowering Youth for Viksit Bharat
४. Making India the Vishwaguru
५. Making India the Startup Capital of the World
६. FIT India- A means to Viksit Bharat
७. Making India the Global Manufacturing Powerhouse
८. Making India Energy Efficient
९. Building the Infrastructure for the Future
१०. Empowering Women and Improving Social Indicators

यामध्ये सहभागासाठी खालील प्रमाणे टप्पे निश्चित केलेले आहेत.

**प्रथम टप्पा - Viksit Bharat Quiz** मध्ये वैयक्तिक रीत्या युवांना सहभागी होता येईल. यासाठी प्रश्न मंजूषा स्पर्धा ही सामान्यज्ञान व भारताची कामगिरी या बाबींवर होणार आहे. माय भारत पोर्टलवर शैक्षणिक संस्था व कॉलेज यांनी सहभाग नोदवावा सदर स्पर्धा दि. २५ नोव्हेबर ते ५ डिसेंबर २०२४ या कालावधित होणार आहे. तरी आपल्या जिल्हयातून या स्पर्धेत संघ सहभागी करावेत. यामध्ये सहभागी होणा-या युवांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

**व्दितीय टप्पा** - विकसित भारत यावर निबंध लेखन स्पर्धा घेतली जाईल यामध्ये शब्द मर्यादा १००० शब्दाची राहील. प्रथम टप्यात सहभागी होवून निवड झालेल्या युवांचा यामध्ये सहभाग राहील. वर नमुद केलेले १ते १० या विषयावर निबंध लेखन करता येईल. यामधिल सहभागासाठी प्रमाणपत्र देण्यात येईल. निबंध स्पर्धा ऑन लाईन पध्दतीने दि. ८ ते १५ डिसेबर २०२४ या कालावधित होणार आहे.

**तृतीय टप्पा - Viksit Bharat PPT Challenge** - वर नमुद केलेल्या विषयांवर राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक राज्यातून ४ युवांची निवड करण्यात येणार आहे. राज्यस्तरावरुन यासाठी राज्याचा निवड करण्यात येणार आहे. निबंध माय भारत पोर्टलवर अपलोड करावयाचे आहेत. दि.२० ते २६ डिसेंबर २०२४ या कालावधित सदर स्पर्धा होणार आहेत. राज्यस्तरावर प्राप्त होणारे निबंध यामधून प्राविण्य काढण्यासाठी परिक्षक नियुक्त करावयाचे आहेत.

**चतृर्थ टप्पा** - राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झालेल्या युवांना प्रथम दि. ११ जानेवारी २०२५ रोजी सादरीकरण करावे लागेल यामधून अंतिम फेरी साठी निवड झालेल्या युवांना भारत देशाचे मा.पंतप्रधान महोदय यांचे समोर संकल्पनांचे सादरीकरण करावयाचे आहे. दि.१२ जानेवारी २०२५ रोजी सदर सादरीकरण होणार आहे.

तरी वरील बदल विचारात घेवून जिल्हा ,विभाग व राज्य युवा महोत्सव मुदतीत संपन्न करावा.

सोबत-केद्र शासन पत्र

( सूरज मांढरे )
आयुक्त,
क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य

प्रत, जिल्हा क्रीडा अधिकारी,नांदेड ,
यांनी उपरोक्त बदल विचारात घेवून राज्य युवा महेत्सवाचे आयोजन करावे,आवश्यक

प्रत माहितीस्तव सादर
१.मा.अपर मुख्य सचिव, क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई.